GOODLUCK
DATE / /

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी
शिक्षणप्रसार."
- शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे

# विवेकानंद कॉलेज कोल्हापूर

## राज्यशास्त्र विभाग

बी.ए. भाग - ३ सन : २०१८-१९

पेपरचे नाव : आधुनिक राजकीय संकल्पना

प्रकल्प विषय : बहुलसंस्कृतीवाद :
विल कीमलिका यांचे विचार

मार्गदर्शक : प्रा. एस.ए. फराकटे

हजेरी क्रमांक : ५६३२ पेपर क्र. XII

GOODLUCK

# अनुक्रमणिका


| अ. क्र | मुद्द्यांचे नाव | पान क्रं |
|---|---|---|
| १. | प्रतिज्ञापत्र | ३ |
| २. | प्रास्ताविक | ४ |
| ३. | बहुलसंस्कृतीवाद : अर्थ | ५-६ |
| ४. | बहुलसंस्कृतीवाद : विकास | ७-१० |
| ५. | विल कीमलिका यांचे विचार | ११-१३ |
| ६. | बहुलसंस्कृतीवाद : दोष | १४-१५ |
| ७. | संदर्भ ग्रंथ | १६ |
| ८. | ऋणनिर्देश | १७ |
| ९. | प्रमाणपत्र | १९ |
| १०. | निष्कर्ष | १८ |

GOODLUCK
DATE / /

# प्रतिज्ञापत्र

आम्ही प्रतिज्ञापूर्व घोषित करतो की सदरचे संशोधन कार्य आमच्या स्वतः च्या सादर माहितीच्या आधारे लिहिलेल्या असून आम्ही स्वतः च्या प्रयत्नाने संशोधन करून आमच्या मार्गदर्शिकाकडून मिळालेल्या माहितीवरून आणि संदर्भ साहित्याचा आधार घेऊन तयार करण्यात आलेला आहे.

ठिकाण :- विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

दिनांक :- १८-०२-१९

| अ.क्र | संशोधक विद्यार्थ्यांची नावे | रोल नं | सही |
|---|---|---|---|
| १ | करण रमेश सानव | ५६९२ | [signature] |
| २. | मयुरी शहाजी शेलार | ५७०५ | [signature] |
| ३. | धनश्री दिनकर शिंदे | ५७१० | [signature] |
| ४. | अमृता विजय गायकवाड | ५५४३ | [signature] |

09/10

GOODLUCK
DATE / /

# प्रास्ताविक

आधुनिक राज्यशास्त्रात 'राजकीय संस्कृती' आणि 'बहुलसंस्कृतीवाद' या संकल्पनांना महत्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. 1980 पासून नागरिकत्वाच्या सिद्धांतामध्ये बहुल-संस्कृतीवाद हा महत्वाचा घटक मानावा लागेल. कारण देशातील नागरीकांची समान राजकीय ओळख करून देताना त्यांच्यातील धार्मिक, वांशिक, भाषिक विविधता विचारात घ्यावी लागते. तेव्हा 'बहुलसंस्कृतीवाद' या संकल्पनेचे विश्लेषण अधिक सुलभ आणि स्पष्ट व्हावे म्हणून राजकीय संस्कृतीची ओळख करून घेणे महत्वपूर्ण वाटते.

'राजकीय संस्कृती' ही संकल्पना समाजशास्त्र व मानववंशशास्त्र यातील 'संस्कृती' या संकल्पनेवर आधारलेली आहे. प्रत्येक समाजाला व्यापक अशी संस्कृती असते आणि अशा समाजातील लोकांच्या राजकीय व्यवस्थेसंबंधीचा जो दृष्टीकोण कल असतो तो राजकीय संस्कृतीचा एक भाग समजला जातो. राजकीय वर्तनासंबंधीचे लोकांचे नीतिनियम, लोकांची सहकार्याची भावना, निष्ठा आणि विश्वास यांचा समावेश राजकीय संस्कृतीत केला जातो.

विल कीमलिका हे ओटावा विद्यापीठाचे तत्वज्ञानाचे प्राध्यापक आणि तत्वज्ञान आणि सार्वत्रिक सेवा योजनेच्या कॅनेडीयन केंद्राचे संशोधक मार्गदर्शक म्हणून ओळखले जातात. सध्या ते ओटावा, कार्लेटन विद्यापीठात तत्वज्ञानाचे visiting Professor म्हणून कार्यरत आहेत. प्रस्तुत प्रकल्पात विल कीमलिका यांचा बहुलसंस्कृतीवादाचा सिद्धांत स्पष्ट करण्यात आला आहे. त्यांच्या 'बहुसंस्कृती समाजातील नागरिकत्व' ह्या पुस्तकाला राज्यशास्त्र कॅनेडीयन परिषदेकडून मॅकपर्सन बक्षीस आणि अमेरीकन राज्यशास्त्र परिषदेकडून 'बूंच अवॉर्ड' मिळाले होते.

GOODLUCK
DATE / /

# बहुलसंस्कृतीवाद : अर्थ

बहुलसंस्कृती (multi-culture) म्हणजे समाजात एका संस्कृतीऐवजी अनेक संस्कृती असणे होय. कारण कोणत्याही देशाची सांस्कृतिक विविधता विचारात घेऊन त्या समाजातील व्यक्तीची ओळख करून द्यावी. बहुलसंस्कृतीवाद म्हणजे समाजात विविध समुदायांची समान ओळख असते आणि त्याबरोबरच प्रत्येक समुदायाची स्वतःची सांस्कृतिक ओळखही कायम राहते. समाजात अल्पसंख्याकांची ओळख कायम राखण्यासाठी बहुसंख्याकांनी व्यापक दृष्टीकोण स्वीकारावा. समाजातील बहुसंख्याकांनी आपले हीतसंबंध लहान गटांवर लादण्याचा प्रयत्न करू नये. अनेक अल्पसंख्याक समुदायांची अशी इच्छा आहे की, ' सर्व नागरिकांना खरी समता (Genuine equality) देण्याची आवश्यकता आहे. त्यांच्या मते, विविध गटांना आणि मतांना सामावून घेणे हे खऱ्या समतेचे वैशिष्ट्य आहे. त्यासाठी समुदायाचे अधिकार निर्माण करावे लागतील. परंतु व्यक्तीगत अधिकारांच्या समर्थकांच्या मते, वंश किंवा संस्कृतीचा विचार न करता प्रत्येक व्यक्तीला समान अधिकार मिळाले पाहिजेत. परंतु अल्पसंख्याकांना समुदायांना सांस्कृतिक अधिकार दिले तर त्यांच्यावर होणारा अन्याय दूर होईल. थोडक्यात विविध समुदायांना प्रादेशिक स्वायत्तता, नकाराधिकार, प्रतिनिधीत्वाची हमी, भाषेचा हक्क प्रदान केले तरच त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न सुटेल. अल्पसंख्याक समुदायांना त्यांची संस्कृती जोपासण्यासाठी विशेष अधिकार देण्यात यावे असा बहुलसंस्कृतीवाद्यांचा आग्रह आहे. परंतु एखाद्या समुदायाला विशेष अधिकार प्रदान करणे हे समतेच्या तत्त्वाच्या विरोधी आहे. परंतु एखाद्या समुदायाने स्वतंत्र राज्याची मागणी केली तर काय होईल ? असे प्रश्न उद्भवतील.

GOODLUCK
DATE / /

बहुलसंस्कृतीवादाचे अनेकांनी समर्थन केले असले तरी नीती- नियमांच्या सार्वत्रिकतेविषयी काही शंका उपस्थित केल्या आहेत. बहुलसंस्कृतीच्या समाजात विविध सांस्कृतिक समुदाय आपली सांस्कृतिक ओळख जोपासण्यासाठी विविध हक्कांची मागणी करतात. परंतु त्यांची मागणी मान्य होत नाही. कारण सामान्य जीवन पद्धती जगणाऱ्या समुदायांच्या मागण्यांनाच मान्यता मिळत असते.

भारतातील समाजात विविध भाषा बोलणारे लोक आहेत. भारतात भाषावार प्रांतरचना होऊन भाषावार राज्ये निर्माण करण्यात आली आहेत, परंतु ही सर्व राज्ये विशिष्ट मर्यादेपर्यंतच स्वायत्त आहेत. त्यांना संघराज्यातून फुटून बाहेर पडण्याचा अधिकार दिलेला नाही. मध्यवर्ती सरकारच्या नियंत्रणाखाली घटक राज्ये आपले अस्तित्व टिकवून राहतात. पंजाब राज्याने स्वतंत्र खलिस्तान राज्याची मागणी केली होती. तसेच तामीळनाडू राज्याने स्वतंत्र द्रविडी राज्याची मागणी होती. अर्थात या मागण्या मान्य झाल्या नाहीत. भारतीय संघराज्यातील भाषावार प्रांत आणि त्यांचा राज्यकारभार पाहिल्यानंतर विविधतेत एकता आढळून येते. विविध भाषा, संस्कृती, जाती, धर्म, प्रदेश अशी विभिन्नता असणारी राज्ये भारतीय संघराज्यात विविध धर्मांचे, भाषांचे, जातींचे, पंथांचे संस्कृतीचे लोक एकतेच्या भावनेतून राहतात. त्यामुळे भारत हे राष्ट्र बहुलसंस्कृतीवादाचे राज्य आहे असे म्हणता येईल. राज्यघटनेने केंद्र सरकार आणि घटक राज्ये यांचे अधिकार स्पष्ट केलेले आहेत. भारतात विविध धर्मांचे, जातींचे, वंशांचे, भाषांचे लोक नागरिक म्हणून राहतात. अशा विविध प्रकारच्या लोकांना समानता, व्यक्तीस्वातंत्र्य, कायद्याचे राज्य, एकात्मता अशा समान गोष्टी आढळतात. सर्वच लोकांना राज्यघटनेने नागरिक म्हणून दर्जा दिलेला असतो.

GOODLUCK
DATE / /

# बहुलसंस्कृतीवादाचा विकास

आधुनिक काळात बहुलसंस्कृतीवाद हा नवा दृष्टीकोण 1980 पासून अस्तित्वात आलेला आहे. बहुलसंस्कृती (Multi-culture) म्हणजे समाजात विविध प्रकारच्या संस्कृती असणे होय. समाजात विविध समुदायांची समान ओळख असते. तसेच प्रत्येक समुदायाची स्वतःची वेगळी सांस्कृतिक ओळखही कायमस्वरूपी असते. समाजातील लोकांच्या विविध प्रकारच्या धार्मिक, वांशिक, भाषिक विविधता विचारात घेऊन बहुलसंस्कृतीवादाचे स्वरूप जाणून घ्यावे लागते.

लोकशाही समाजव्यवस्थेत विविध समूहांची समान ओळख असते, त्याबरोबरच प्रत्येक समूहाची स्वतःची सांस्कृतिक ओळखही वेगळीच असते. उदा. भारतीय संस्कृती ही भारतातील नागरीकांची समान ओळख असली तरी भारतात विविध धर्मांचे, वंशांचे, जातींचे, भाषेचे, परंपरांचे लोक राहत असतात. महाराष्ट्रातील नागरिकांची स्वतःच्या संस्कृतीची ओळख ही अन्य राज्यांतील नागरीकांच्या संस्कृतीपेक्षा भिन्न असते.

ऐतिहासिकदृष्ट्या बहुलसंस्कृतीवादाचा विकास अभ्यासताना नागरीकत्वाच्या विकासाचे चार कालखंड विचारात घ्यावे लागतात.

अ) ग्रीक व रोमन लोकांचा कालखंड
ब) उत्तर मध्ययुगीन व पूर्व आधुनिक कालखंड
क) भांडवलवादी व उदारमतवादी विकासाच्या कालखंड
ड) 19 व्या आणि 20 व्या शतकातील उदारमतवाद व बहुलसंस्कृतीवाद यांचा कालखंड

GOODLUCK
DATE / /

अ) ग्रीक व रोमन लोकांचा पारंपरिक कालखंड :

या काळात दोन प्रकारची ग्रीक गणराज्ये होती. लोकशाही पद्धतीचे अथेन्स नगरराज्य व सर्वंकष शासन पद्धतीचे नगरराज्य होय. नगरराज्यातील जे नागरिक राज्यकारभार व न्यायदान या दोन्ही कार्यात सहभाग घेत असत, त्यांनाच विशेष नागरिकत्वाचा दर्जा असे. बाकीचे सामान्य नागरिक, स्त्रिया, गुलाम, मुले, परकीय यांना नागरिकत्वाचा दर्जा दिला जात नसे. थोडक्यात, ग्रीक कालखंडात काही थोड्या लोकांनाच नागरी सुविधा, सोई मिळत.

रोमन साम्राज्यवादाच्या कालखंडात नागरिकत्वाबाबत सुधारणा होऊन सर्व नागरिकांना राजकीय सहभागाचा समान अधिकार देण्यात आला. नागरीकांना कायद्याद्वारे संरक्षण मिळून नागरिकत्वाच्या अधिकाराद्वारे सुखसोई मिळू लागल्या. त्यामुळे सांस्कृतिक विविधता असणाऱ्या विशाल समाजाचे नियंत्रण करणे सोईचे व सुलभ झाले होते. तरीपण स्त्रीया, ग्रामीण नागरिक यांना राजकीय सहभाग घेता येत नव्हता. म्हणजेच त्याना नागरिकत्वाचा दर्जा मिळत नव्हता.

ब) उत्तर मध्ययुगीन आणि पूर्व आधुनिक कालखंड :-

१६ व्या शतकापासून नागरिकत्वाच्या अधिकारात सुधारणा घडवून आली. जॉन बोदीन, थॉमस हॉब्ज, जॉन लॉक, मॅकीयाव्हेली, मॉंटेस्क्यू इ विचारवंतांनी नागरिकत्वाच्या गुणवत्तेचे समर्थन केले. सर्व नागरिकांना समान अधिकार देण्यात आले. त्यामुळे 'स्वतंत्र व स्वायत्त नागरिक' ही संकल्पना प्रस्थापित झाली. 'सर्वांना समान अधिकार' या संकल्पनेचे मूळ फ्रेंच राज्यक्रांतीमध्ये आढळते. नागरीकांना निर्णय निर्धारण प्रक्रियेत सहभागी होण्याचा अधिकार प्राप्त झाला. नागरिकत्वाच्या अधिकाराचा समावेश मानवी हक्काच्या जाहिरनाम्यात करण्याचे महत्वाचे कार्य फ्रेंच राज्यक्रांतीने केले.

क) भांडवलवादी व उदारमतवादी विकासाचा कालखंड :-

१९ व्या व २० व्या शतकातील उदारमतवाद व बहुलसंस्कृतीवाद यांचा कालखंड म्हणून ओळखला जातो. या कालखंडात नागरिकत्वाची संकल्पना अधिकच विकास पावली. सरंजामशाही संपुष्टात आल्यामुळे राज्यातील नागरिकांना काही अधिकार प्राप्त झाले. समाजव्यवस्था विकसित होऊन राष्ट्रीय व राजकीय समूह निर्माण झाले. टी.एच. मार्शल यांच्या मते, नागरिकांना नागरी, राजकीय व सामाजिक हक्क प्राप्त झाले.

अ) नागरी हक्क :- भाषण स्वातंत्र्य, संचार स्वातंत्र्य, मालमत्तेचा अधिकार आणि कायद्यासमोर समानता

ब) राजकीय हक्क :- मतदानाचा हक्क, निवडणूक लढविण्याचा हक्क, सार्वजनिक पद धारण करण्याचा हक्क इ. राजकीय हक्कांमुळे नागरिकांना राजकीय प्रक्रियेत सहभागी होता येते.

क) सामाजिक हक्क :- सामाजिक हक्कामुळे व्यक्तीला सामाजिक दर्जा प्राप्त होतो. सर्वांना समानतेची वागणूक देणे, समान हक्क देणे, समान संरक्षण देणे यांचा समावेश सामाजिक हक्कात केला जातो. समाजातील भेदभाव, विषमता नष्ट करून अनेक वंचित व्यक्तींना न्याय मिळवून दिला जातो. समान हक्क आणि समानतेची वागणूक दिल्यामुळे समानता, धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय प्रस्थापित होऊन राज्यातील सर्व नागरिकांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो.

ड) १९ व्या आणि २० व्या शतकातील उदारमतवाद आणि बहुजन-संस्कृतीवाद यांचा कालखंड :-

उदारमतवादी नागरिकत्व म्हणजे धर्म, वंश, जात, भाषा, लिंग असा कोणताही भेदभाव न ठेवता सर्व नागरिकांना नागरिकत्वाचा दर्जा समानतेने देणे होय. टी. एच. मार्शल यांच्या मते, समाजातील सर्व नागरिकांना नागरिकत्वाचा दर्जा प्राप्त करून दिला असला तरी प्रत्यक्षात समाजातील काही लोकांनाच नागरिकत्वाचे फायदे मिळतात. बहुसंख्य नागरिकांना मूलभूत अधिकार व न्यायाचा पुरस्कार केलेला आहे. समाजातील सर्व नागरीकांना समान मुलभूत अधिकार व स्वातंत्र्य यापासून वंचित राहावे लागते. जॉन रॉल्स यांच्या न्याय सिद्धांतात सामाजिक न्यायाचा पुरस्कार केलेला आहे. समाजातील सर्व नागरिकांना समान मुलभूत अधिकार दिले पाहिजेत, त्यासाठी त्यांना समानतेची वागणूक मिळाली पाहिजे. प्रत्येक सेवेत, कार्यात सर्व नागरिकांना समान संधी मिळाली पाहिजे. समाजातील ज्या वर्गाला मूलभूत अधिकार व स्वातंत्र्य यापासून वंचित व्हावे लागते त्यांना न्याय्य वागणूक दिली पाहिजे. उदारमतवाद्यांच्या मते, समाजातील सर्व नागरिकांना नागरिकत्वाच्या अधिकाराचा लाभ होण्यासाठी सर्वांना समानतेच्या भूमिकेतून स्वातंत्र्य प्राप्त झाले पाहिजे.

GOODLUCK
DATE / /

# बहुलसंस्कृतीवाद : विल कीमलिका यांचे विचार

विल कीमलिका हे ओटावा विद्यापीठाचे तत्वज्ञानाचे प्राध्यापक आणि तत्वज्ञान आणि सार्वत्रिक सेवा योजनेच्या कॅनेडीयन केंद्राचे संशोधक मार्गदर्शक म्हणून ओळखले जातात. सध्या ते ओटावा, कार्लेटन विद्यापीठात तत्वज्ञानाचे visiting Professor म्हणून कार्यरत आहेत. विल कीमलिका यांनी ऑक्सफर्ड प्रेसमधून पुढील तीन ग्रंथ प्रकाशित केले.

1. Liberalism, community and culture (1989)
2. Contemporary political Philosopy (1990)
3. Multicultural Citizenship (1995)

यापैकी 'बहुसंस्कृती समाजातील नागरिकत्व' ह्या पुस्तकाला राज्यशास्त्र कॅनेडीयन परिषदेकडून मॅकपर्सन बक्षीस आणि अमेरीकन राज्यशास्त्र परिषदेकडून 'बूच अवॉर्ड' मिळाले.

विल कीमलिका यांनी नागरिकत्वाचे नवे संदर्भ या दृष्टीकोणातून बहुलसंस्कृतीवाद आणि जागतिकीकरण यासंबंधी विचार मांडले आहेत. संघराज्य शासनपद्धती असणाऱ्या राज्यासाठी कीमलिका यांनी बहुलसंस्कृतीवादाचे विचार मांडलेले आहेत. संघराज्यातील घटक राज्ये आपली स्वायत्तता आणि अधिकार सुरक्षित ठेवून संघराज्यात सामील झालेली असतात. विल कीमलिका यांनी समानता आणि बहुलसंस्कृतीवाद या दोहोंत समन्वय साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रतिनिधीत्व आणि सदस्यत्व यांच्या समन्वयातून अशी व्यवस्था केली आहे की ज्यामध्ये सांस्कृतिक विभिन्न गट सामावून घेतले जातात. विल कीमलिका यांनी पुढील व्यवस्था सुचविलेली आहे.

अ) समाजातील सर्व नागरीकांचे राजकीय व नागरी हक्क सुरक्षित

GOODLUCK
DATE / /

राहावेत, संघटना स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, संचार स्वातंत्र्य इत्यादी अधिकार या व्यवस्थेत सामावून घ्यावेत म्हणजे त्या समाजातील व्यवस्थेत त्यांचे वेगळेपण सुरक्षित राहते.

ब) अशा व्यवस्थेत कायदेशीर आणि घटनात्मक तरतुदीद्वारे सांस्कृतिक विभिन्न गटांना सामावून घेऊन त्यांना त्यांच्या वेगळेपणानुसार अधिकार देण्यात यावेत.

विल कीमलिका यांनी अशा विभिन्न विविध गटांसाठी तीन प्रकारचे अधिकार सांगितले आहे.

अ) स्वयंशासनाचा अधिकार (self Government Rights)
ब) बहु- वांशिक अधिकार (Poly - ethnic Rights)
क) विशेष (राखीव) प्रतिनिधीत्वाचे अधिकार
(special Rights of Representation of Minorities)

<u>अ) स्वयंशासनाचा अधिकार</u> →

विल कीमलिका यांच्या मते, राजकीय समाजात हा अधिकार देताना काही प्रमाणात स्वायत्तता आणि प्रादेशिक अधिकार देण्यात यावेत. राज्यात सामील होण्यापूर्वी त्यांची स्वायत्तता आणि अधिकार सुरक्षित राहतील. उदा. संघराज्य शासनपद्धतीमध्ये घटक राज्ये आपले स्वायत्त अधिकार सुरक्षित ठेवूनच सामील होत असतात. जर घटक राज्यांच्या स्वातंत्र्यावर, अधिकारांवर आक्रमण झाले. तर घटक राज्ये संघराज्याची बंधने झुगारून देतात. वेळप्रसंगी अशी घटक राज्ये संघराज्यातून बाहेर पडतात. घटक राज्यांना संघराज्यातून फुटून जाण्याचा अधिकार (Power of secede) घटक राज्यांना देण्याची घटनात्मक तरतूद असते. थोडक्यात स्वयंशासनाचा

GOODLUCK
DATE / /

अधिकार सुरक्षित ठेवून अल्पसंख्याक समुदायांना स्वायत्तता आणि प्रादेशिक अधिकार क्षेत्र दिले जाते.

ब) बहु-वांशिक अधिकार →

जेव्हा स्थलांतरीत समुदायांनी आपली वांशिक परंपरा प्रस्थापित असलेल्या संस्कृतीमधील वांशिक परंपरांना स्विकारावे अशा विचारसरणीला विरोध करण्यासाठी बहु-वांशिक अधिकारांची संकल्पना आहे. अशा व्यवस्थेत विविध वांशिक समुदायांना आपल्या परंपरा, भिन्नत्व, प्रकट करण्याचा अधिकार देण्यात यावा. अर्थात, प्रस्थापित समाज व्यवस्थेने कोणताही दबाव आणू नये. विविध वांशिक समुदायांनी आपल्या परंपरांचे, संस्कृतीचे रक्षण, पोषण होऊन संवर्धन करावे यासाठी राज्यव्यवस्थेकडे मागण्या केलेल्या आहेत.

क) विशेष (राखीव) प्रतिनिधीत्वाचे अधिकार →

विल किमलिका यांच्या मते, राजकीय व्यवस्थेचे स्वरूप अधिक लोकशाहीप्रधान व्हावे यासाठी राज्यातील स्त्रिया, दरिद्री, विकलांग लोकांना कायदेमंडळात प्रतिनिधीत्व मिळावे. अल्पसंख्याक समुदायाचे विधिमंडळात प्रतिनिधीत्व निर्माण व्हावे यासाठी त्यांना विशेष अधिकार देण्यात यावेत.

GOODLUCK
DATE / /

# बहुलसंस्कृतीवाद : दोष

विल कीमलिका यांच्या मते, बहुलसंस्कृतीवादामुळे काही दोष निर्माण होतात.

1. समाजव्यवस्थेत समूहांचे महत्व वाढावे, समुदायांना स्वायत्तता व अधिकार प्राप्त होऊन त्यांना समानतेची वागणूक मिळावी यासाठी बहुलसंस्कृतीवादाला महत्व प्राप्त झालेले आहे. अर्थात, समाजातील सर्व स्तरांतील लोकांना सामावून घेण्याचे उद्दीष्ट स्वीकारल्यामुळे समाज हा एकजिनसी राहत नाही. समाजात विविध गट, समुदाय घटक व विविध संस्कृती यांना महत्व प्राप्त झाल्यामुळे 'व्यक्ती' या घटकावर मर्यादा पडलेल्या दिसतात. व्यक्तीचे राज्यातील महत्व कमी होते.

२. समाजातील समुदायांचे बाह्य घटकांपासून संरक्षण होण्यास समुदाय आपल्या सदस्यावर कठोर बंधने आणतात, मर्यादा लादतात. त्यामुळे व्यक्तीस्वातंत्र्य धोक्यात येते.

३. समाजातील समूहांना, समुदायांना अंतर्गत निर्बंध लादण्याचे अधिकार प्राप्त झाल्यामुळे व्यक्तीच्या अस्तित्वाला धोका निर्माण होऊन समाजातील ऐक्य संपुष्टात आले आहे. बहुलसंस्कृतीवादामुळे व्यक्तीचे स्वातंत्र्य, अधिकार यावर काही मर्यादा येऊन पडल्यामुळे त्यांचे स्थान गौण, कमी महत्वाचे झाले आहे. विल कीमलिका यांनी बहुलसंस्कृतीवादाची व्यवस्था सांगितलेली आहे. तिचे समर्थन करण्यासाठी विविध राष्ट्रांतील समाजव्यवस्थांचे अवलोकन केले असता असे म्हणता येईल. बहुसंख्य राष्ट्रांमध्ये विविध धर्मांचे,

वंशांचे, वर्णांचे, भाषेंचे, जातींचे लोक राहताना दिसतात. अर्थात अशा समाजव्यवस्थेत विविधता असूनही राष्ट्र ही संकल्पना साकार झालेली आहे. बहुलसंस्कृतीवादामध्ये विविध धर्मांचे, जातीचे, वंशांचे, संस्कृतींचे लोक एकत्रित राहत असतील आणि त्यांना राज्यघटनेने समान अधिकार बहाल केले असतील तरीही प्रत्यक्षात समाजातील विशिष्ट वर्गाना, धर्मांना, जातींना, वंशांना जी वागणूक मिळते, जे स्वातंत्र्य व अधिकार मिळतात ते स्वातंत्र्य अधिकार समाजातील वंचित, उपेक्षित, दुर्बल, दरिद्री लोकांना प्राप्त होत नाहीत. घटनेने दिलेल्या समानतेच्या, स्वातंत्र्याच्या, समानतेच्या अधिकारांचे समर्थन करून चालणार नाही. प्रत्यक्षात समाजातील सर्व स्तरांतील सर्व नागरिकांना स्वातंत्र्याचा, क्षमतेचा, अधिकाराचा लाभ होतो काय याचा विचार होणे गरजेचे आहे. तेव्हा बहुलसंस्कृतीवादात समुदायांचे स्वातंत्र्य, स्वायत्तता आणि महत्त्व ठराविक मर्यादेपर्यंत ठीक आहे. परंतु बहुलसंस्कृतीवादातील प्रत्येक घटकांचे पृथक्करण केले तर त्याचा हेतू किती प्रमाणात साध्य झाला हे समजून येईल.

ऑस्ट्रेलिया, अर्जेंटीना, युरोप, कॅनडा, बल्गेरिया, जर्मनी, नेदरलँड, सर्बिया, भारत, इंग्लंड, जपान, मलेशिया, मॉरिशस, मेक्सिको, अमेरिका, संयुक्त अरब राष्ट्रे इत्यादी देशांत बहुलसंस्कृतीची समाजव्यवस्था आहे. तेथे विविध धर्मांचे, जातींचे, भाषांचे, वंशांचे नागरिक राहतात. अशा विभिन्न प्रकारच्या लोकांत व्यक्तीस्वातंत्र्य, समानता, एकजिनसीपणा, कायद्याचे राज्य अशा समान गोष्टी आढळतात अशा विविध राष्ट्रांच्या राज्यघटनांनी त्यांना अधिकार दिलेले आहेत. थोडक्यात लोकशाहीची मूलतत्त्वे समाजाच्या तळापर्यंत पोहोचून नागरीकांना स्वातंत्र्याचा, अधिकारांचा लाभ घेता आला पाहिजे असे विलकीमलिका यांचे मत आहे.

GOODLUCK
DATE / /

# निष्कर्ष

बहुलसंस्कृती म्हणजे समाजात एका संस्कृतीऐवजी अनेक संस्कृती असणे होय. कारण कोणत्याही देशाची सांस्कृतिक विविधता विचारात घेऊन त्या समाजातील व्यक्तींची ओळख करून दयावी. बहुलसंस्कृतीवाद म्हणजे समाजात विविध समुदायांची समान ओळख असणे आणि त्याबरोबरच प्रत्येक समुदायाची स्वतःची सांस्कृतिक ओळखही कायम राहते. बहुलसंस्कृतीच्या समाजात विविध सांस्कृतिक समुदाय आपली सांस्कृतिक ओळख जोपासण्यासाठी विविध हक्कांची मागणी करतात. परंतु त्यांची मागणी मान्य होत नाही. कारण सामान्य जीवन पद्धती जगणाऱ्या समुदायांच्या मागण्यांनाच मान्यता मिळत असते.

प्रस्तुत प्रकल्पात विल कीमलिका यांनी नागरिकत्वाचे नवे संदर्भ या दृष्टीकोणातून बहुलसंस्कृतीवाद आणि जागतिकीकरण यासंबंधी विचार मांडले आहेत. संघराज्य शासनपद्धती असणाऱ्या राज्यासाठी कीमलिका यांनी बहुलसंस्कृतीवादाचे विचार मांडलेले आहेत. विल कीमलिका यांनी समानता आणि बहुलसंस्कृतीवाद या दोहोंत समन्वय साधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

GOODLUCK
DATE / /

# संदर्भ ग्रंथ

१. आधुनिक राजकीय संकल्पना - पाठ्यपुस्तक
B.A. III Sem - VI

२. Liberalism, Community and Culture (1989)

३. Contemporary Political Philosopy (1990)

४. Multicultural Citizenship (1995)

५. बहुसंस्कृती समाजातील नागरिकत्व. पुस्तक

६. आधुनिक राजकीय संकल्पना - सुपर गाईड

७. https://www.researchgate.net

८. https://blogs.navbharattimes.indiatimes.com

९. shodhganga.inflibnet.ac.in

१०. https://Khabar.ndtv.com

GOODLUCK
DATE / /

# ऋणनिर्देशक

'श्री स्वामी विवेकानंद' शिक्षणसंस्थेच्या विवेकानंद महाविद्यालयातील B.A III अंतर्गत राज्यशास्त्र विभागातील आधुनिक राजकीय संकल्पना या विषयातील विल कीमलिका यांचे बहुलसंस्कृतीवादाचे विचार हा प्रकल्प करण्याची संधी मिळाली. याबद्दल आम्ही 'शिवाजी विदयापीठ व विवेकानंद कॉलेजचे ऋणी आहोत. या प्रकल्पासाठी मोलाचे मार्गदर्शक लाभले ते म्हणजे प्रा. एस. एफ. फराकटे तसेच कॉलेजचे प्राचार्य मा. श्री. एस. वाय. होनगोकर सर याचे मोलाचे मार्गदर्शन लाभले याबद्दल मी त्यांचा मनापासून ऋणी आहे.

GOODLUCK
DATE / /

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की,

1. करण रमेश सातव
2. मयुरी शहाजी बोलार
3. धनश्री दिनकर शिंदे

या विद्यार्थ्यांनी 'राज्यशास्त्र विभाग' या विषयांतर्गत सादर केलेला प्रकल्प अहवाल आहे.

सदरचा प्रकल्प हा आधुनिक राजकीय संकल्पना या विषयांतर्गत विल कीमलिका यांचे बहुसंस्कृतीवादाचे विचार या घटकावर आधारलेला आहे.

ठिकाण :- विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
दिनांक :- १८-०२-१९

प्राचार्य
डॉ. एस. वाय. होनगेकर

मार्गदर्शक
प्रा. एस. एफ. फराकटे

D. A. Pawar
HEAD
DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)

Rajdhani
DATE / /

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी
शिक्षणप्रसार."
- शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे

# विवेकानंद कॉलेज कोल्हापूर

## राज्यशास्त्र विभाग

बी. ए. भाग -३ सन : २०१८-१९

पेपरचे नाव -: आधुनिक पाश्चात्य राजकीय विचार

प्रकल्प विषय -: हेगेलची द्वंद्वात्मक विकासपद्धती

मार्गदर्शक -: प्रा. डी. ए. पवार सर

हजेरी क्र. -: ५५२६

Rajdhani

DATE / /

# अनुक्रमणिका


| अ.न. | शिर्षकाचे नाव | पृ. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | १ |
| २. | प्रतिज्ञापत्र | २ |
| ३ | जीवन परिचय | ३-५ |
| ४ | हेगेलची ग्रंथसंपदा | ५ |
| ५ | हेगेलच्या चिन्हांद | ६-८ |
| ६ | हेगेलची द्वंद्वात्मक विकासपद्धती | ९-१० |
| ७ | द्वंद्वविकासाची प्रक्रिया | ११-१५ |
| ८. | ऋणनिर्देशक | १६ |
| ९ | संदर्भ | १७ |
| १० | निष्कर्ष | १८ |
| ११. | प्रमाणपत्र | १९ |


10/10

Rajdhani
DATE / /

# प्रस्तावना

तत्वज्ञानाचा गाढा अभ्यासक, प्रज्ञावंत, ज्ञानतपस्वी असा जॉर्ज विल्हेल्म फिड्रिश हेगेल यांच्या तत्वज्ञानाचा प्रभाव जगभर होता. पाश्चात्त तत्त्वज्ञानाच्या विकास करणारा आणि जगाचे विव्दादी अर्थविवरण करणारा एक युग प्रवर्तक तत्वज्ञ म्हणून त्याचे स्थान अत्यंत महत्वाचे.

हेगेलने धर्म, इतिहास, तत्वज्ञान, राजकारण या विषयावर ग्रंथलेखनाचे कार्य केले तसेच तत्वज्ञान, निती, कला, इतिहास, धर्म कायदा या विषयांवर व्याख्यानेही दिली. सत्य हे पूर्ण असते. प्रत्येक युक्तिवाद हा बुद्धीनिष्ठा असतो जे सत्य किंवा वास्तव असते ते बुद्धीगम्य असते (The real is the rational and the rational is the real). विचाराचे मूळ स्वरुप विसंगतिवर आधारलेले असते प्रत्यक्ष व्यवहारात विसंगती, विरोध, विषमता, निषेध या गोष्टी आढळतात केवळ सुसंगतिवर आधारलेला विचार हा वास्तव, सत्य नसतो असे मत हेगेलचे होते.

'विरोधविकासवादाचे तत्व' असेही हेगेलच्या विकासपद्धतीला म्हटले जाते. हेगेलने 'फिलॉसॉफी ऑफ राईट' या त्यांच्या ग्रंथात हे तत्व मांडले आहे. सत्-असत्, वाद-प्रतिवाद, पक्ष-प्रतिपक्ष यांना सापेक्ष मानले आहे. द्वंद्वात्मक प्रक्रियेत हेगेलने विरोधाला महत्वाचे स्थान दिले. परंतु विरोधाला जास्त ताणले नाही. संघर्ष, विरोध यांना मर्यादित करुन समन्वय, संवाद साधण्यात तो यशस्वी झाला आहे.

निसर्ग, विज्ञान, इतिहासातील घटना या माहितीच्या आधारे विरोधविकासवादाला नविन आकार देण्याचे कार्य त्यांनी केले.

Rajdhani

DATE / /

# प्रतिज्ञापत्र

आम्ही प्रतिज्ञापूर्व घोषित करतो की, सदरचे संशोधन कार्य आमच्या स्वतःच्या सादर माहितीच्या आधारे लिहलेल्या असून आम्ही स्वतःच्या प्रयत्नाने संशोधन करून आमच्या मार्गदर्शकाकडून मिळालेल्या माहितीवरून आणि संदर्भ साहित्याचा आधार घेवून तयार करण्यात आलेला आहे.

ठिकाण :- विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

दिनांक :- 11 फेब्रुवारी 2019

| अ.क्र | संशोधक विद्यार्थ्यांची नाव | रोल.नं | सही |
|---|---|---|---|
| 1 | हर्षवर्धन सुनिल चौगले | ५५२६ | [illegible] |
| 2. | पुजा हरिदास आगलावे | ५५03 | [illegible] |
| 3. | सलोनी मधुकर आंग्रे | ५५३४ | S.M.Angre |
| 4. | प्रफुल्ल रुपचंद चव्हाण | ५५29 | Chavan |
| 5. | सुजय सुरेश चौपडे | ५५23 | Chopade |
| 6. | धनश्री दिनकर शिंदे | 5710 | |

Rajdhani
DATE / /

# जॉर्ज विल्हेल्म फ्रिड्रिश हेगेल

## जीवन परिचय :-

फिश्टे, शेलिंग, आणि कांट यांच्यानंतर जर्मनीत आणि युरोपात झालेला एक महान प्रज्ञावंत आणि प्रतिभावंत तत्वज्ञ म्हणून हेगेलचे नाव घ्यावे लागेल. पाश्चात्य तत्वज्ञानावर आपल्या विचारांचा विशेष प्रभाव पाडणारा विचारवंत म्हणून त्याचे नाव अजरामर आहे. हेगेलची विचारप्रणाली विस्तीर्ण, व्यापक, सर्वस्पर्शी आणि वैशिष्ट्यपूर्ण अशी आहे. पाश्चात्य तत्वज्ञानाचा विकास करणारा आणि जगाच्या चिद्वादी अर्थविवरण करणारा एक युग प्रवर्तक तत्वज्ञ म्हणून त्याचे स्थान अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे आहे.

जॉर्ज हेगेलचा जन्म जर्मनीतील स्टुटगार्ड येथे २७ ऑगस्ट १७७० रोजी मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्याचे वडिल वुर्टेंबर्गच्या सरदाराकडे कनिष्ठ महसूल अधिकारी म्हणून काम करत होते. त्याची आई सुशिक्षित, प्रेमळ स्वभावाची होती. तिने त्याला लहानपणीच लॅटिन भाषा शिकवली. त्याचे प्राथमिक शिक्षण स्टुटगार्डच्या 'जॅरिन' स्कूलमध्ये तर माध्यमिक शिक्षण 'जिम्नॅशिअम' मध्ये झाले. १७८८ साली तो उच्च शिक्षणासाठी ट्युबिंगेन विद्यापिठात गेला. तेथे तो १७९० साली तत्वज्ञानातील एम. ए. ची परिक्षा पास झाला. त्यावेळी तत्वज्ञान विषया-बरोबर धर्मविद्या हा विषयही विद्यार्थ्यांना घ्यावा लागत असे. हेगेलने एम. ए. साठी "आत्म्याचे अमरत्व मान्य केल्यास मानवी कर्तव्याची मर्यादा कोणती ?" हा शोधनिबंध सादर केला होता. तारुण्य सहृदय गमती जमती, उनाडपणा यापासून तो दूर होता, त्यामुळे विद्यार्थीदशेत त्याचे मित्र त्याला म्हातारबाबा (old man) म्हणून हिणवत असत. नाही म्हटले तरी विद्यापिठात त्यावेळी शेलिंग आणि होल्डरलिन हे त्याचे जिवलग मित्र होते. १७९३ मध्ये हेगेलने धर्मविद्येतील शेवटची पदवी संपादन करुन तो पदवीधर धर्मोपदेशक बनला. त्याने बेर्न शहरातील एका व्यापाराकडे खाजगी शिक्षकाची नोकरी धरली. १७९३ ते १८०० ही सात वर्षे हेगेलच्या जिवनातील

Rajdhani
DATE / /

महत्त्वाची वर्षे ठरली गेली. या काळात त्याने कान्टच्या तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास केला. तसेच फिश्टे, शेलिंग, याकोबी, स्पिनोझा इत्यादी विचारवंतांच्या तत्त्वज्ञानावरील निबंधाचा आणि ग्रंथांचा सूक्ष्म अभ्यास केला. दरम्यान १७८९ मध्ये झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतीचा काही अंशी त्याच्यावर प्रभाव पडला. मानवी स्वातंत्र्याची प्राप्ती होण्यासाठी झालेली राज्यक्रांती आणि तिच्या उद्रेकानंतर आलेली भीषण, एकतंत्री, लहरी जुलमाची लाट यामध्ये परस्परसंबंध आहे. याची जाणीव हेगेलला फ्रेंच राज्यक्रांतीमुळे झाली. तरीपण स्वातंत्र्य हे मानवी समाजाचे व प्रत्येक व्यक्तीचे मुलभूत व श्रेष्ठतम तत्त्व आहे. या सिद्धांतापासून तो थोडाही विचलित झाला नाही. स्वातंत्र्याची प्राप्ती सहजासहजी होणारी नाही. तसेच ती उत्पाताने क्रांतीनेही मिळणार नाही अशा निष्कर्षाप्रत तो आला होता.

१८०१ मध्ये हेगलला येना विद्यापिठात प्रपाठकाची जागा मिळाली. पुढे दोन वर्षांनी त्याला तेथे प्राध्यापकाची जागा मिळाली. दरम्यान येनाची लढाई झाल्यानंतर हे विद्यापीठ बंद झाले. त्यामुळे हेगलला नोकरीस मुकावे लागले, त्याने एक वर्षभर एका वृत्तपत्राचे संपादकत्व पत्करले. १८०८ मध्ये त्याला न्युरेंबर्ग येथे प्रथम रेक्टर आणि पुढे शिक्षक म्हणून नोकरी मिळाली. शिस्त, संयम आणि अध्यापन कौशल्य यामुळे लोक त्याला कोटच्या तोडीचा प्राध्यापक समजू लागले. १८१६ पर्यंत तेथे त्याने नोकरी केली.

न्युरेंबर्ग येथे असताना १६ सप्टेंबर, १८११ मध्ये हेगेलने मारी वन ट्युशर या तरुणीशी विवाह केला. हेगेलचे वय तिच्यापेक्षा २२ वर्षांनी मोठे होते. शांत, सुशील व खानदानी स्वभावाच्या या महिलेबरोबर हेगेलने सुखाचा संसार केला. त्यांना दोन आपत्ये झाली. १८१६ ते १८१८ या काळात हेगेलने हायडेलबर्ग विद्यापिठात प्राध्यापकाची नोकरी केली. दरम्यान १८१८ साली हेगलला बर्लिन विद्यापिठात प्राध्यापक म्हणून कार्य केले. प्राध्यापकाच्या सेवेत असताना हेगेलने आपले तत्त्वज्ञानविषयक चिंतन आणि ग्रंथलेखन सातत्याने चालू ठेवले होते. वयाच्या ६१ व्या वर्षी १४ नोव्हेंबर, १८३१ रोजी कॉलरा रोगाने या महान जर्मन तत्त्ववेत्त्याची प्राणज्योत अनंतात विलिन झाली. तत्त्वज्ञानाचा गाढा अभ्यासक, प्रज्ञावंत, ज्ञानतपस्वी, अशा या हेगेलच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव सर्वत्र जगभर पसरला होता. त्याच्या पश्चात बर्लिन, ऑक्सफर्ड,

Rajdhani


केंब्रिज, स्कॉटलँड इत्यादी विद्यापिठात हेगेलच्या तत्वज्ञानाच्या अभ्यासाची केंद्रे सुरु करण्यात आली. कार्ल मार्क्स, एंगल्स, थॉमस हिल ग्रीन, वालास, बोसांके, ब्रॅडले इत्यादी विचारवंतांवर हेगेलच्या तत्वज्ञानाचा विशेष प्रभाव पडला.

# हेगेलची ग्रंथसंपदा

१७९३ ते १८३१ या काळात हेगेलने धर्म, इतिहास, तत्वज्ञान, राजकारण या विषयावर ग्रंथलेखनाचे कार्य केले. हेगेलच्या काही ग्रंथाचा उल्लेख पुढीलप्रमाणे करता येईल.

1. Life of Jesus, (1796)
2. Critique of Positive Religion (1796)
3. Difference between the Philosophical Systems of Fichte and Shelling (1801)
4. The Phenomenology of Spirit (mind) (1807)
5. Science of Logic. (1812 I & II Vols, 1816 - III Vol.)
6. Encyclopaedia of the philosophical sciences in outline (1817)
7. Outline of the philosophy of Right. (1821)
8. Philosophy of Religion (1895)
9. Philosophy of History (Colonial Press, New York, 1899)

हेगेलने ग्रंथलेखनाबरोबरच तत्वज्ञान, निती, कला, इतिहास, धर्म कायदा इत्यादी विषयांवर अनेक व्याख्याने दिली होती. त्याच्या पश्चात त्याच्या मुलाने व अनुयायांनी ही व्याख्याने ग्रंथरुपाने प्रकाशित केली. बर्लिन विद्यापिठातील हेगेलने दिलेल्या व्याख्यानांच्या आणि टिपणांच्या आधारे त्याच्या विद्यार्थ्यांनी ह्यांच्या पश्चात काही ग्रंथ प्रकाशित केले.

Rajdhani
DATE / /

# हेगेलचा चिद्वाद

सामान्यत: Idealism या शब्दाचा अर्थ 'चिद्वाद' किंवा 'आदर्शवाद' असा घेतला जातो. 'आदर्शवादात' (चिद्वादात) मुख्य विचार असा असतो की अंतिम श्रेष्ठ सत्ता मन, आत्मा, विचार असून ती सर्व विश्वाची उगमस्थाने आहेत. चिद्वाद म्हणजे एक प्रकारचा ध्येयवाद किंवा कल्पनावाद मानावा लागेल. एक अनंत, शाश्वत, मनापासून किंवा आत्मतत्वापासून सर्व विश्वाची उत्पत्ती झाली असून तेच एक असे अंतिम तत्व आहे की ते सर्व वस्तूंचे मूळ आधार, उगमस्थान आणि लयस्थान आहे. भौतिक जग, जडद्रव्य हे सुद्धा आत्मतत्वावरच अवलंबून आहे. विश्वातील सर्व घटनांचे स्वरूप हेतुपुरस्सर असून सर्व मुल्यांची उत्पत्ती त्याच्यापासून झालेली आहे. परंपरागत चिद्वादात प्लेटो, बर्कले, लायब्निस आणि कांट यांचा समावेश केला जातो. तर फिश्टे, शेलिंग, हेगेल, टी. एच. ग्रीन, ब्रॅडले, बर्नार्ड बोसांके यांचा एकोणिसाव्या व विसाव्या शतकातील चिद्वादी प्रणालीत केला जातो.

अशा प्रकारे चिद्वादी चळवळ विश्वव्यापी असली तरी तिचा तात्विक अविष्कार जर्मनी पुरताच मर्यादित होता. युरोपीय विचारांच्या चिद्वादी चळवळीचा कालखंड १७९० ते १८३१ असा अल्पकालीन ४० वर्षांपुरता मर्यादित होता. युरोपात स्पिनोझाच्या शुद्धवादाचे पुनरुज्जीवन होवू नये म्हणून हेगेलने आपली चिद्वादाची भूमिका प्रखरपणे मांडली. वास्तविक प्राचीन ग्रीक संस्कृती आणि आधुनिक विज्ञान संस्कृती ही वास्तववादावर तुलना करता हेगेलच्या चिद्वादाचा प्रभाव अल्पकालीन ठरला गेला आणि विशिष्ट संस्कृतीपुरताच मर्यादित राहिला. परंतु जीवनाचा अर्थ लावण्यासाठी जी अंतर्दृष्टी लागेल ती दाखवण्याचे कार्य चिद्वादाने केले आहे. विश्वाचे अगाध, अज्ञेय व गहन रहस्य दाखवण्याचे महत्वाचे कार्य चिद्वादाने केले आहे. या चिद्वादातून निरपेक्ष सत्ता आपणापुढे ज्ञानप्राप्तीसाठी उदयास आली. ही चिद्वादी चळवळ फिश्टे, शेलिंग, शापेन हॉवर आणि हेगेल या विचारवंतांनी चालू ठेवली असा सर्व स्वरूप व वस्तूविरहित तत्वज्ञान कांटच्या तत्वज्ञानाची परिणिती मानावी लागेल.

हेगेलच्या मते, विश्व (अंतिम सत्ता) हे निरपेक्ष किंवा श्रेष्ठ मन किंवा आत्मा असून ते कालमानानुसार विविध अवस्थातून जात असते. सरतेशेवटी मानवाच्या प्रज्ञेत त्याला स्वतःची जाणीव होत असते. तरीही हेगेलचे अंतिम सत्य हे कालनिरपेक्ष, शाश्वत, सर्वव्यापी आणि स्वयंपूर्ण साफल्य आहे. हेगेलने आपल्या द्वंद्वात्मक तार्किक पद्धतीने प्रत्येक गोष्ट इतर गोष्टीशी कशी जोडलेली असते. आणि आता संपूर्ण सत्ता घडण्यास कशी सहाय्यभूत होत असते हे दाखवून दिले. त्यांच्या मते, विश्वात ज्या असंख्य विविध घटना व घटक वस्तू घडतात त्या परस्परावलंबी असतात. हेगेलची विचारप्रणाली व्यापक, सर्वगामी, सर्वस्पर्शी व सर्वसमावेशक असून त्यामध्ये संदिग्धता किंवा विसंगती नाही तर ती त्या सर्व समग्र प्रणालीचे सत्य स्पष्ट करीत असेल.

हेगेलच्या मते, सत्य हे पूर्ण (Whole) असते. प्रत्येक युक्तिवाद हा बुद्धीनिष्ठा असता जे सत्य किंवा वास्तव असेल आणि जे बुद्धीगम्य असेल ते सत्य, वास्तव असते (The real is the rational and the rational is the real). विश्वातील प्रत्येक गोष्टीला आणि घटनेला अर्थ आहे. जगातील सर्व प्रक्रिया बुद्धीनिष्ठ असतात. ग्रहमाला, जिवंत प्राणी, वस्तू बुद्धीशाली असतात. त्यांच्या वर्तनात विशिष्ट हेतू, नियोजन, व्यवस्था असते. हेगेलची चिद्वाद विचारप्रणाली एवढी व्यापक, सर्वव्यापी, सर्वस्पर्शी आहे की तिच्यात कोणतीही संदिग्धता किंवा विसंगती नाही, त्यामुळेच ती पूर्ण असते. त्यामुळेच ती पूर्ण सत्य असते. जे खऱ्या अर्थाने संपूर्ण सत्य असते. विचार हेगेलचा सिद्धांत दोन तत्त्वावर आधारलेला आहे. १) जग हे बुद्धीगम्य असते २) बुद्धीगम्य जग हे व्यापकपूर्ण असते. व्यापकपूर्ण म्हणजे जगाच्या विकासाचा क्रम सुसंगत असतो. तर प्रत्यक्ष व्यवहारिक जीवनात विसंगती, विरोध, विषमता निषेध या गोष्टी आढळून येतात. केवळ सुसंगतीवर आधारलेला विचार हा वास्तव, सत्य नसतो. तर विचाराचे मुळ स्वरूप विसंगतीवर आधारलेले असते विचार विसंगतीकडे दुर्लक्ष करून सुसंगती साधण्याचा प्रयत्न करत असतो. अर्थात अशी सुसंगती आपणापासून जीवनाचे सत्य स्वरूप झाकून टाकते. तेव्हा विसंगतीचा नियम समजावून घेणे आवश्यक असते असे मत हेगेल यांनी मांडले आहे. हेगेलच्या आदर्शवादी (चिद्वादी) तत्त्वज्ञानातील मुलभूत कल्पना अशी आहे की, जिवंत समग्रता (Organic Whole) ही तिच्या भागांच्या

किंवा अवयवांच्या परस्परावलंबनावर आणि परस्परसंबंधावर अवलंबून असते. जिवंत प्राणी, वनस्पती आणि मानव यांच्या पूर्णत्वाचा विचार करताना त्यांच्यातील परस्परावलंबन आणि परस्परसंबंध समजून येतात.

जिवंत प्राणी, वनस्पती आणि मानव यांच्या पूर्णत्वाचा विचार करताना परस्परसंबंध समजून येतात. जिवंत प्राणी आणि वनस्पती आणि सेंद्रिय वस्तू यांच्या ठिकाणी भाग पूर्णाशिवाय पूर्ण (Whole) भागाशिवाय अस्तित्वात असू शकत नाही. हात, पाय, डोळा, कान, आतडी, श्वासनलिका इ. अवयव हे पूर्ण शरिराचे कार्य करणारे परस्परावलंबी अवयव आहेत. शरिराचे भाग म्हणून त्यांना अस्तित्व, कार्य व महत्व आहे. शरिरापासून त्यांना अलग केले तर त्यांचे कार्य बंद पडते व अस्तित्व नसते. त्यांच्यामुळे शरिर बनते आणि पूर्ण शरिर म्हणून कार्य करते आणि त्या पूर्ण शरिरातील जिवंतपणाही तेवढाच महत्वाचा असतो. प्रयोगशाळेत ठेवलेल्या शरिराच्या मांसाच्यात जिवंतपणा नसतो, तो बुद्धीगम्य नसतो त्यामुळे त्याला पूर्णत्व नसते.

हेगेलच्या मते, सर्व सत्ता बुद्धीशील (Rational) असते. संपूर्ण विश्वाची रचना सुव्यवस्थित व बुद्धीगम्य आहे. या विश्वातील प्रत्येक गोष्टीला घटनेला स्वतंत्र स्थान, अर्थ, वैशिष्ट्य व महत्व असते. अर्थात, प्रत्येक गोष्टीचा आणि घटनेचा पूर्णाशी, समग्राशी जो संबंध असतो तो जाणून घेतला असता तिचे अस्तित्व व कार्य समजून घेऊ शकते. हेगेल संपूर्ण अस्तित्वाला किंवा सत्तेला सत्य समजत असल्याने तो कोणत्याही मर्यादित, आंशिक, अपूर्ण भागाला असत्य मानतो. कोणत्याही मर्यादित भागाचे पूर्णापासून स्वतंत्र अस्तित्व, अमूर्त आभासमय सत्य असते.

Rajdhani
DATE / /

# हेगेलची द्वंद्वात्मक विकासपद्धती

हेगेलच्या द्वंद्वात्मक विकासपद्धतीला 'विरोध विकासवादाचे विकासवादाचे तत्व' असेही संबोधण्यात येते. हेगेलने आपल्या 'फिलॉसॉफी ऑफ राईट' या ग्रंथात विरोधविकासवादाचे तत्त्व मांडले आहे. हेगेलच्या मते, विश्वाच्या विकासाचे मूळ चितूशक्ती असून या चितूशक्तीचा अविष्कार म्हणजेच जगाचा आजपर्यंतचा इतिहास होय. इतिहासाचे स्वरूप गतिमान व बदलणारे आहे. विश्वामध्ये जे बदल होत आहेत ते मानवी विचारातून होत असतात. आणि मानवी विचारांच्या संघर्षातूनच जगाचा इतिहास घडविला आहे. विरोध (Contradiction) सर्व जीवनाच्या मुळाशी असून विरोधाचे तत्व जगाचे नियंत्रण करीत असते, उदा. बीजामध्ये वेगळे अस्तित्व निर्माण करण्याची उपजत प्रवृत्ती असते. विरोधामुळेच जीवन, गती, वाढ, विकास होऊ शकतो. विरोधाअभावी विश्वातील सर्व गोष्टी निर्जिव, निष्प्राण होतात. दोन परस्पर गोष्टी किंवा गुणधर्म परस्परांच्या संदर्भात विरोधी असले तरीही तेथे त्या दोहोंमध्ये एकमेकांना सामावून घेणारी व्यापकता असते. त्यामुळेच त्यांच्यातील विरोध, वैर, विसंगती या गोष्टी नष्ट होवून विकास घडून येतो. द्वंद्वातील दोन्ही घटना किंवा गोष्टी स्वतंत्र, अलग केल्या तर त्या कोणालाच महत्व राहत नाही. परंतु पूर्णाच्या व्यापक व समग्र योजनेत दोन्ही गोष्टींचे स्थान व महत्व विचारात घेतले तर त्यांच्या विरोधातूनच, संघर्षातूनच विकास घडून येतो हे समजून येते.

हेगेलच्या मते, विश्व हे एवढे गतिमान, बदलणारे आहे की प्रतिक्षणी ते नविन रूप धारण करीत असते. आता सत्तेचे जे रूप असते ते दुसऱ्या क्षणी नसते. सत्ता कधीच सातत्याने एकाच रूपाने टिकून राहत नाही. विकासक्रमात उच्चतर स्वरूप प्राप्त होत असते. विश्वात असे काहीही नाही की ज्याला दुसरी बाजू नाही. विरोध, भेद, द्वंद्वे या गोष्टी जगाच्या रचनेत मुळातच असतात त्यांच्या संघर्षातून परस्पर विरोधी क्रियातून जगाचे, निसर्गाचे व्यवहार चालतात. अशा प्रकारे परस्पर विरोधी

विरोधी गोष्टी, घटना असल्या तरी त्या परस्पर सहायक, पोषक, उत्तेजक आणि विकासाला कारणीभूत ठरणाऱ्या असतात. विश्वाच्या रचनेतील जीवंत प्राणी, जीवंत वनस्पती यांच्या विकासाच्या अवस्था विचारात घेतल्या असता त्यातील होणारे बदल समजून येतात. वनस्पतींच्या जीवनक्रमात बीज उगवणे, रोप होणे, त्याला पाने येणे, कळ्या येणे त्या फुलणे, फुलातून फळ येणे, ती पक्व होणे, त्यातील रस आटणे, सुकणे व शेवटी अंत होणे असा निसर्गक्रम चालू असतो.

मानवी जीवनक्रमात मूल जन्माला येणे, अर्भकावस्था, बाल्यावस्था, किशोरावस्था, यौवनावस्था, प्रौढावस्था, जरा वार्धक्यावस्था, मृत्यू असा विकासक्रम आढळतो. अशा प्रकारे संपूर्ण विश्व, संपूर्ण सत्ता ही प्राणमय किंवा विकसनशील असते. तिच्या विकास प्रक्रियेत प्रेरणा, विरोध करण्याची प्रेरक शक्ती असते. तिथे विरोध विसंगती, व्याघातपूर्ण स्थिती असते. असे विरोध विवेकहीन, तर्कविरहित नसतात उलट ते चिंतनाला अधिक उत्तेजक ठरतात. दोन परस्पर विरोधी संकल्पनांचा एक विचार होऊन त्यातून व्यापक, समृद्ध अशा तिसऱ्या संकल्पनेचा उदय होतो. अशा विरोधातून विकास पावणाऱ्या क्रियेला, पद्धतीला हेगेल द्वंद्वविकास किंवा विरोध विकास पद्धती म्हणतो.

Rajdhani
DATE / /

# द्वंद्वविकासाची प्रक्रिया

हेगेलच्या मते, द्वंद्वविकासाची प्रक्रिया तीन अवस्थातून जात असते.

१) Thesis - पक्ष - वाद
२) Antithesis - प्रतिपक्ष - प्रतिवाद
३) Synthesis - समन्वय - संवाद

'Synthesis' या अवस्थेला 'संवाद', 'समन्वय', 'संश्लेषण', 'समावर्तन', 'मिथुनभाव', 'समुद्भाव' अशा विविध नावांनी मराठीत संबोधले जाते. तसेच वाद-प्रतिवाद, सत्-असत्, भाव-अभाव, पक्ष-प्रतिपक्ष अशा विविध नावांनी द्वंद्वाच्या दोन्ही बाजू स्पष्ट केल्या जातात. मुळातून स्वरूप जेव्हा एक बाजू असते. आणि तिला तिच्या गुणधर्मामुळे अतिरेकी महत्त्व येते तेव्हा तिला विरोध, प्रतिक्रिया करणारी दुसरी बाजूही तेवढीच असते. त्या दोहोंच्या अतिरेकी व एकांगीपणामुळे त्यांच्यातील सत्यता मर्यादित होते, परंतु त्यांच्यातील एकांगीपणा सोडून देऊन त्यांच्यातील गुणधर्मांना योग्य महत्त्व देऊन त्या दोन्ही बाजूतून समन्वय सुसंवाद साधता येतो असे हेगेलचे मत आहे. दोन्ही बाजू परस्पर विरोधी असतात तरी त्या परस्परांना पूरक (complementary) व पोषक असतात. दोन्ही बाजूंच्या समन्वयातून एक श्रेष्ठ, समृद्ध, व्यापक अशी तिसरी संकल्पना तयार होते. अशा प्रकारे पक्ष-प्रतिपक्ष आणि समन्वय किंवा वाद-प्रतिवाद आणि संवाद अशी द्वंद्वविकासाची कल्पना सातत्याने चालू असते. हेगेलच्या मते, द्वंद्वाविषयी विरोधाशिवाय विकासक्रमाची गतिशीलता आणि जिवंतपणा टिकूच शकत नाही.

हेगेलच्या मते, द्वंद्वविकास पद्धतीत असा नियम आढळून येतो की कोणत्याही संकल्पनेला जेव्हा विरोध होतो तो बाहेरून न होता तिच्या गर्भातूनच होत असतो. पक्ष किंवा वाद यातूनच प्रतिपक्ष किंवा प्रतिवाद उदयाला येतात. अर्थात पक्ष प्रतिपक्ष, वाद-प्रतिवाद यांच्यातील भूमिका अतिरेकी, एकांगी होत गेल्या असल्या तरी असत्याची निर्मिती होते. तेव्हा अशा वेळी त्यांचे संश्लेषण किंवा समन्वय होणे गरजेचे असते. समन्वय होताना दोन्ही विरोधी संकल्पनांमधील जिवंतपणा टिकून राहण्यासारखा जो योग्य भाग

भाग असतो आणि भावी विकासक्रमाला उत्तेजक व पोषक ठरणारा असतो तो महत्वाचा व आवश्यक असतो.

हेगेलची द्वंद्वविकासाची प्रक्रिया पुढील काही उदाहरणांवरुन समजून घेता येईल. मानवी जीवनात पैसा अत्यंत महत्वाचा व आवश्यक घटक आहे. असा पक्ष किंवा वाद जेव्हा उद्भवतो तेव्हा तिथे त्याला विरोध करणारा प्रतिपक्ष किंवा प्रतिवादही तेवढाच प्रभावी असतो. मानवी जीवनात पैसा हा घटक निरर्थक आहे. अशी दुसरी बाजूही तेवढीच प्रखरपणे पुढे येते. शहरी वातावरणात मनुष्याचे पैशाशिवाय पानही हालत नाही. प्रत्येक वस्तू, गोष्ट त्याला पैशाद्वारेच मिळू शकते परंतु तोच मनुष्य सहारा किंवा कच्छच्या वाळवंटात अडकला आहे अशा वेळी त्याला पैशाचा काहीही उपयोग होत नाही. पैशापेक्षाही त्याला इतर वस्तू जीवनावश्यक, महत्वाच्या वाटतात. अशा प्रकारे वाद-प्रतिवाद यामध्ये संघर्ष होत असताना त्या दोहोत असा समन्वय, संवाद साधावा की पैसा हा कालमानानुसार आणि गरजेनुसार श्रेष्ठ असतो. दुसरे उदाहरण मनुष्याचे घेऊन मनुष्य हा विचार करणारा बुद्धीनिष्ठ प्राणी आहे. असा जेव्हा वाद किंवा एक पक्ष, बाजू पुढे येते तेव्हा मनुष्य हा पशुप्रमाणे वर्तन करणारा प्राणी आहे अशी दुसरी बाजूही पुढे येते.

या दोन्ही संकल्पनातून संवाद असा साधता येईल की, मनुष्याने आपल्या बुद्धीमत्तेचा वापर करुन योग्य प्रकारे वर्तन करावे की जेणेकरुन मनुष्य आणि प्राणी यांच्यातील फरक समजून येईल. मनुष्य हा देवातील देव असतो असा वाद मांडला तर मनुष्य हा सैतानातील सैतान आहे असाही विरोध करणारा प्रतिवाद असू शकतो. अशा संघर्षातून समन्वय साधणे गरजेचे असते. मनुष्याने सैतानी पशुवृत्तीचा त्याग करुन देवाप्रमाणे बनावे असा सुसंवाद साधणे योग्य होय.

हेगेलच्या मते, मनुष्य प्राणी हा वैचारिक, बुद्धीगम्य प्राणी आहे. तो प्रत्येक गोष्टीचा, घटनेचा व्यवहारी अर्थ लावून मोकळा होतो. परंतु तत्वज्ञानी तत्वतेचा त्या वस्तूंचा, घटनांचा तात्विक, तार्किक विचार करत असतो. रस्त्यावर एखाद्या ठिकाणी दोन पुरुष किंवा दोन स्त्रिया एकत्रित उभ्या असतील तर मनुष्य त्याचा फारसा विचार करत नाही. परंतु एक पुरुष व एक स्त्री एकत्रित उभे असतील तर मनुष्याची कल्पनाशक्ती जागृत होते. आणि त्याच्या मनात वाद-प्रतिवाद सुरु होतात. ती दोघेजण पती-पत्नी आहेत की बहिण-भाऊ ?

की त्यांच्यात अन्य संबंध आहेत अशा विचारांची निर्मिती होते. अशा वेळी सामान्य व्यक्ति व्यवहारी पातळीवरुन या घटनेचा विचार करते आणि त्याचे संबंध उमगले तर फारसा विचार करत नाही. परंतु तत्त्ववेत्ते या घटनेतून समन्वय, संश्लेषण साधण्याचा प्रयत्न करतात. ती दोघे पती पत्नी असतील तर त्यांच्यातील दांपत्यप्रेम एकरुप आहे असेल का? ते बहिण भाऊ असतील तर प्रेमबंधन अतूट असेल, का? अन्य संबंध असेल तर त्यांच्यात एकरुपता, प्रेमभावाचे एकत्व असेल का? असे वैचारिक संवाद किंवा निष्कर्ष काढले जातात. तत्त्ववेत्ता त्या स्त्री-पुरुषाच्या प्रेमभावाचे एकत्व (संवाद) साधण्यात यशस्वी होतो. नेमके हेच विलक्षण एकत्व हेगेलच्या द्वंद्वविकासात आढळते.

हेगेलने सत्-असत्, वाद-प्रतिवाद, पक्ष-प्रतिपक्ष यांना परस्पर सापेक्ष मानले आहे. द्वंद्वात्मक प्रक्रियेत त्याने विरोधाला महत्त्वाचे स्थान दिले परंतु विरोधाला जास्त ताणले नाही. संघर्ष, विरोध यांना मर्यादित करुन समन्वय, संवाद साधण्यात तो यशस्वी झालेला आहे. धनुष्याची दोरी एवढी ताणावी की तुटणार नाही की धनुष्य मोडणार नाही, परंतु दोरीला लावलेला बाण निश्चितपणाने लक्ष्यकेंद्र भेदून जाईल. एवढाच ताण पुरेसा आहे. विरोधातून, संघर्षातून विकास साधला जावा हेच अंतिम सूत्र हेगेलच्या विचारात आढळते.

हेगेलच्या मते, संपूर्ण विश्व हे जिवंत म्हणून कार्य करीत आहे आणि विकास पावत आहे. संपूर्ण सत्ता ही प्राणमय आहे. किंवा विकसनशील आहे जिवंत कार्यपद्धतीप्रमाणेच संपूर्ण विश्वाचे किंवा सत्तेचे कार्य चालत असते. तिच्या विकासाची प्रेरणा विरोधात असते. विरोध नसेल तर सत्ता निष्प्राण, सुन्न ठरेल, तिला गती चैतन्य राहणार नाही. विरोध ही विकासाला प्रेरणा देते चेतना देते, ती प्रेरकशक्ती आहे. परस्पर संघर्षातून, विरोधातून अंतिम सत्तेची एकता आणि सुसंवाद साधला जातो. बिल ड्युरँट यांच्या मते, जगातील सर्व कलह, तंटे, द्वंद ही खरी व वास्तव आहेत. संघर्षातून विकास होणे हा नियमच आहे. जगाच्या व्यवहारात आपणाला संकटांना, आपत्तींना तोंड द्यावे लागते. विरोध, दुःखे, संकटे, आत्मबल, कर्तव्य यातून व्यक्तिचे आत्मबल वाढते. आणि व्यक्तित्व प्रभावी, कणखर बनते. जीवनात व्यक्तिने विरोध, दुःखे भोगणे हे जीवंतपणाचे लक्षण असून ते नवसमाज निर्मितीला प्रेरणा देते. जगाच्या योजनेत विकारांना, विरोधांना विशिष्ट स्थान असते विरोधाशिवाय

विकारांशिवाय, संघर्षाशिवाय जगात काहीही मोठे प्राप्त होत नाही. हिटलर, मुसोलिनी, नेपोलियन यांच्या राक्षसी महत्वकांक्षा त्यांच्या राष्ट्रविकासाला सहाय्यक, पोषक ठरल्या असल्या तरी त्यांचे प्रयोजन भव्य, दिव्य-गोष्टींची निर्मिती करण्याचा पुरुषार्थ सिद्ध करणे हा होता. हेगेलच्या मते, जगाचा इतिहास ही सुखाची नाट्यगृहे नाहीत, तर तेथे दुःख, विरोध, संघर्ष, आव्हाने, संकटे यांचे सातत्याने नाट्य चाललेले असते.

हेगेलच्या मते, जेव्हा जेव्हा इतिहासातील विरोध संघर्ष पराकोटीला गेले आणि मानवापुढे प्रचंड संकटे, आव्हाने उभी राहिली तेव्हा तेव्हा महान चळवळी, घडामोडी जन्माला आल्या आणि इतिहासाची वाटचाल गतीशील, चैतन्यशील बनते. अशा प्रकारचा समाज (राष्ट्र) इतर समाजाच्या (राष्ट्रांच्या) अंमलाखाली जातो, परावलंबी, गुलाम बनतो. गतिशील इतिहासात जे महापुरुष, महान नेते, योद्धे, साहित्यिक, वैज्ञानिक जन्माला येतात ते जगात नवनिर्मिती आणि सुधारणा घडवून आणतात. ते इतिहास घडवत नाहीत तर ते नवसमाजनिर्मितीची साधने बनतात. समाजाला जागृत करण्याचे, चैतन्यमय करण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगी असते.

हेगेलने इतिहासाच्या आधारे द्वंद्वात्मक विरोध विकासवाद स्पष्ट केला आहे. त्याने ग्रीक राज्याला वाद, रोमन साम्राज्याला (धार्मिक राज्याला) प्रतिवाद मानून त्या दोहोंच्या समन्वयातून जर्मन राष्ट्र राज्य निर्माण झाले असे प्रतिपादन केले आहे. हेगेलने जर्मन राष्ट्र राज्याचे स्वरुप सर्वश्रेष्ठ, आदर्श मानले होते.

लुडविग फेयरबाख या भौतिकवादी तत्ववेत्त्याने चिद्वादाच्या तत्वज्ञानाला विरोध केला. त्याने हेगेलचा विरोध-विकासवाद फेटाळून लावला. परंतु कार्ल मार्क्स यांनी विरोध-विकासवादाचा चिकित्सकपणे पुनर्विचार केला. मार्क्सच्या मते, हेगेलच्या विरोध विकासवादी पद्धतीने विकासाची कल्पना होती. विश्वातील घटना आणि घडामोडी यांचा विचार करताना हेगेलने त्यांचे परस्परसंबंध व परस्परावलंबित्व विचारात घेऊन उत्पत्ती, बदल व लय यांची एक विकास प्रक्रिया म्हणून पाहिले. परस्पर विरोधी गोष्टींचा संघर्ष हा या प्रक्रियेच्या मुळाशी असतो. हे दाखविण्याचा त्याने प्रयत्न केला. मार्क्सच्या मते, अधिभौतिक विचार पद्धतीच्या तुलनेत हेगेलची विकासवादी पद्धती जरी पुरोगामी होती तर त्याच्या तत्वज्ञानात्मक

Rajdhani
DATE / /

# निष्कर्ष

जॉर्ज विल्हेल्म फ्रिड्रिश हेगेल हा एक सामाजिक विचारवंत होतो. त्याचप्रमाणे हेगेल हा तत्त्वज्ञानी विचारवंत होता. पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा विकास करणारा आणि जगाचे चिकित्सक अर्थविवरण करणारा एक युग प्रवर्तक होता. "सत्य हे पूर्ण असते प्रत्येक युक्तिवाद बुद्धीनिष्ठ असते जे सत्य किंवा वास्तव असते प्रत्येक युक्तिवाद बुद्धीगम्य असते. (The real is the rational & the rational is the real) असे त्याचे मत होते हेगेल हा धर्म, इतिहास, तत्त्वज्ञान, राजकारण यांचा अभ्यासक होता. व त्याचबरोबर त्यांनी या विषयावर ग्रंथलेखनही केले आहे. केवळ सुसंगतिवर आधारलेला विचार हा वास्तव, सत्य नसतो अशा मताचा हेगेल होता.

Rajdhani
DATE / /

# ऋणनिर्देशक

"श्री. स्वामी विवेकानंद" शिक्षण संस्थेच्या विवेकानंद महाविद्यालयातील B.A. III अंतर्गत "राज्यशास्त्र" या विषयातील "आधुनिक पाश्चात्य राजकीय विचार" या विषयातील "हेगेलची द्वंद्वात्मक विकासपद्धती" हा प्रकल्प करण्याची संधी मिळाली. याबद्दल आम्ही 'शिवाजी विद्यापिठ' व 'विवेकानंद कॉलेज' चे ऋणी आहोत. या प्रकल्पासाठी मोलाचे मार्गदर्शन लाभले ते म्हणजे प्रा. श्री. डी. ए. पवार सर तसेच कॉलेजचे प्राचार्य मा. श्री. डॉ. एम. बाय. होनगेकर सर यांचे मार्गदर्शन लाभले. या बद्दल मी त्यांचा मनापासून ऋणी आहे.

Rajdhani
DATE / /

# संदर्भ


१. आधुनिक पाश्चात्य राजकीय विचार

2. WWW. Georg Wilhelm Feiedeich Hegel. - Wikipedia.

Rajdhani
DATE / /

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की,

1. हर्षवर्धन सुनिल चौगले
2. पुजा हरिदास आगलावे
3. सलोनी मधुकर आंगले
4. प्रफुल्ल रुपचंद चव्हाण
5. सुजय सुरेश चौपडे

या विद्यार्थ्यांनी "राज्यशास्त्र" विभाग या विषयांतर्गत सादर केलेला प्रकल्प अहवाल आहे.

सदरचा प्रकल्प हा "आधुनिक पाश्चात्त्य राजकीय विचार" या विषयांतर्गत "हेगेलची द्वंद्वात्मक विकासपद्धती" या घटकावर आधारलेला आहे.

ठिकाण :- विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
दिनांक :- 11 फेब्रुवारी, 2019

प्राचार्य
(डॉ. एम्. वाय. होनगेकर)

मार्गदर्शक
(मा. प्रा. श्री. डी. ए. पवार सर)

HEAD
DEPARTMENT ... TICAL SCIENCE
VIVEK... GE, KOLHAPUR
... (AUTONOMOUS)